# प्रसिद्धी विभाग

## २०१३ – २०१४

### विद्यार्थिनी कल्याण मंडळ – तक्रार पेटी उद्घाटन

लोकमत पुणे, रविवार, दि. १३ ऑक्टोबर २०१३ ४

## खेडला विद्यार्थिनींसाठी सुरु केली तक्रारपेटी



हुतात्मा राजगुरु विद्यालयात विद्यार्थिनींसाठी सुरु करण्यात आलेल्या तक्रारपेटीचे उद्घाटन पोलीस उपनिरीक्षक ए. बी. शेख यांच्या हस्ते केले.

राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी तक्रारपेटी सुरु करण्यात आली आहे. राजगुरुनगर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आसिफराजा शेख यांच्या हस्ते तक्रारपेटीचे उद्घाटन करण्यात आले.

'जागर जाणिवांचा' अभियनांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थिनी कल्याण मंडळाच्या वतीने हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. मुलींना छेडछाड, पाठलाग, एकतर्फी भावना इत्यादी प्रकारांना सामोरे जावे लागते. म्हणून ही तक्रारपेटी सुरु करण्यात आली आहे.

शेख म्हणाले, की मुलींनी धाडसाने तक्रारपेटीद्वारे आपल्या तक्रारी मांडल्या पाहिजेत. आम्ही गांभीर्याने त्यांची दखल घेऊ. विद्यार्थिनींनी स्वतःच्या संरक्षणाची जबाबदारी इतरांवर टाकण्यापेक्षा स्वतः पुढे येऊन आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. घरगुती छळ व महिला सुरक्षा कायदा काय आहे, याचे लोकशिक्षण देण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले, तर आभार प्रा. मच्छिंद्र मुळुक यांनी मानले. (वार्ताहर)

डॉ. संजय शिंदे<br>
प्रसिद्धी विभाग प्रमुख